# समिती दर्पण

ऑक्टोबर २०२४

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


## समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये एक अशी आठ वसतिगृहे आहेत. त्यात सुमारे ११०० विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# समर्पित योगदानाला कृतज्ञतेचा सलाम

## प्रतापराव पवार यांचा विविध संस्थांतर्फे मानपत्र देऊन सन्मान





विद्यार्थी साहाय्यक समितीचे गेल्या अर्धशतकापासून नेतृत्व करणारे, समितीप्रमाणेच अनेक सामाजिक संस्थांचे पालकत्व स्वीकारत त्यांना प्रगतिपथावर नेणारे समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांनी योगदान दिलेल्या संस्थांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात झालेला हा कृतज्ञता सन्मान सोहळा विद्यार्थी साहाय्यक समिती, सकाळ रिलीफ फंड, सकाळ इंडिया फाउंडेशन, सकाळ सोशल फाउंडेशन, मराठवाडा मित्रमंडळ, ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती, स्व- रुपवर्धिनी, महाराष्ट्र मेडिकल फाउंडेशन, बाएफ, बालग्राम, बालकल्याण, वनस्थळी, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, सकाळ माध्यम समूह, इंडियन न्यूजपेपर सोसायटी, पिंपरी- चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट, गर्जे मराठी ग्लोबल, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महाराष्ट्र, पुणे अंधशाळा, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग आदी संस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते मानपत्र देऊन श्री. पवार यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी सर्व संस्थांचे पदाधिकारी व उपस्थितांनी उभे राहून टाळ्यांच्या कडकडाटात पवार यांच्या कार्याला सलाम केला.

लेखक, अभिनेते, दिग्दर्शक योगेश देशपांडे यांनी मानपत्राचे वाचन केले. विनया देसाई यांनी सूत्रसंचालन केले. मराठवाडा मित्रमंडळाचे कार्याध्यक्ष भाऊसाहेब जाधव यांनी आभार मानले.

> समाजातील वंचित घटकांविषयी संवेदना, स्वच्छ विचार आणि त्याला कृतिशीलतेची जोड देत प्रतापराव पवार यांनी विविधांगी कार्य केले. आपल्या अनुभवाचे दान अनेक संस्थांना दिले. त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी, अत्यंत समृद्ध आणि संपन्न आहे.
>
> \- **रघुनाथ माशेलकर,** ज्येष्ठ शास्त्रज्ञ

> आई, शिक्षक यांच्यासह अनेकांचे माझ्यावर संस्कार आहेत. अनेक मोठ्या माणसांचा सहवास मला लाभला. अनेक संस्थांवर काम करण्याची संधी मिळाली. या संस्थांतील सहकाऱ्यांचे उत्तम सहकार्य लाभले. कुटुंबीयांमुळे हा प्रवास सुखद झाला. या सर्वांना हा कृतज्ञता सन्मान अर्पण करतो.
>
> \- **प्रतापराव पवार,** अध्यक्ष, विद्यार्थी साहाय्यक समिती

## योगविषयक कोर्समध्ये १२ विद्यार्थी उत्तीर्ण



विद्यार्थी सहाय्यक समिती, प्राचीन संहिता गुरुकुल आणि योग महाविद्यालय, बारामती यांच्या सहयोगाने समितीमध्ये योगविषयक योग प्रोटोकॉल इन्स्ट्रक्टर (Yog protocol instructor) हा कोर्स घेण्यात आला. या अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेत समितीतील १८ पैकी १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रात्यक्षिक परीक्षेत सर्व १८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या कोर्समध्ये मुलांना ग्रंथोक्त ज्ञान आणि प्रॅक्टिकल या दोन्ही गोष्टी शिकवण्यात आल्या. जून महिन्यात केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयातर्फे YCB level 1 परीक्षा घेण्यात आली. एकूण अठरा जणांनी परीक्षा दिली. या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या मुलांना प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम १९ ऑक्टोबरला आपटे वसतिगृहातील मोडक हॉलमध्ये झाला. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून श्री. प्रफुल्ल पेंढारकर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नीलेश महाजन आणि डॉ. हरीश पाटणकर उपस्थित होते. डॉ. अभय व्यवहारे यांनी हा कोर्स घेण्यामागची समितीची भूमिका विशद केली. समितीतील सर्व मुलांनी हा कोर्स करावा, अशी अपेक्षा कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी दुर्गेश पवार आणि मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी उपस्थित होते.

**उत्तीर्ण विद्यार्थी :** अंशु कुमारी, प्राजक्ता क्षीरसागर, गायत्री माने, निकिता पाणपाटील, पल्लवी पवार, मेहंदी बडदे, समृद्धी कोल्हे, सानिका भुजबळ, लोकेश मारघडे, धनश्री वीरकर, उत्तम चिपकर, ज्ञानेश्वरी थोरवे.

## समिती कार्याच्या प्रसारासाठी दिवाळी निधी संकलन उपक्रम

विद्यार्थी साहाय्यक समितीचे कार्य केवळ समाजाच्या मदतीवर सुरू आहे. पिढ्यान् पिढ्या संस्थेला देणगी देणारे देणगीदार आहेत, त्याप्रमाणे निरपेक्ष भावनेने निधी संकलनासाठी हातभार लावणारे कार्यकर्तेही आहेत. निधी संकलन किती जिकिरीचे आहे, त्याचबरोबर संस्थेच्या कार्यात आपणही खारीचा वाटा उचलला पाहिजे, याची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी दिवाळी निधी संकलन हा उपक्रम दरवर्षी राबविला जातो.

दिवाळीच्या सुटीत विद्यार्थी आपल्या घरी जातात, त्यावेळी गावातून, परिसरातून त्यांनी समितीसाठी काही निधी संकलन करावे, असे अपेक्षित असते. त्यासाठी त्यांना समितीकडून ठराविक रकमेचे पावतीपुस्तक दिले जाते. ही रक्कम मोठी नसते, मात्र विद्यार्थ्यांना संस्थेची माहिती आपल्या भागात देता यावी, त्या माध्यमातून समितीच्या कार्याचा प्रसार व्हावा, तेथील गरजू, होतकरू विद्यार्थ्यांपर्यंत ही माहिती पोचावी, विद्यार्थ्यांचे संभाषण कौशल्य सुधारावे, हा या उपक्रमामागचा हेतू आहे. या उपक्रमात सहभाग नोंदवून, समितीच्या कार्याला हातभार लावावा, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

मनोगत

## अंतरीचे दीप उजळताहेत...



दिवाळी हा चैतन्याचा, मांगल्याचा उत्सव. अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारा सण. म्हणूनच आपल्या संस्कृतीत दिवाळीला इतके महत्त्व आहे. अगदी लहानापासून थोरांपर्यंत सर्वांनाच या सणाबद्दल आकर्षण असते, उत्साह असतो. सुवासिक उटणी लावून उबदार पाण्याने अंघोळ असेल, दारातील आकर्षक रंगसंगतीची रांगोळी असेल, कोपऱ्यातील मिणमिणती पणती, लखलखते आकाशदिवे, खमंग, गोड फराळाचा आस्वाद आणि कुटुंबीय, मित्र, आप्तेष्टांसोबत गप्पा, भेटीगाठी, मनोरंजनाचे कार्यक्रम... हे सारे खूप जपून ठेवावे, असे क्षण असतात.

आपल्या रोजच्या धामधुमीत निवांतपणा हरवला आहे. स्वतःचा स्वतःसाठी स्वतःशी संवादही होत नाही, मित्र, आप्तेष्ट यांना इच्छा असूनही वेळ देणे शक्य होते, असे नाही. विद्यार्थ्यांपासून निवृत्तांपर्यत प्रत्येक जण आपापल्या कार्यबाहुल्यात व्यग्र आहे. तंत्रज्ञानामुळे सर्व काही वेगाने होते, तसे होणे अपेक्षित असते म्हणून या वेगाच्या रथावर आपण सारेच जण स्वार होतो आणि धावत सुटतो. हा वेग आपल्याला पुढे नेतो, पण सोबत असलेले कुठे राहतात, की हरवतात याचा विचार करायलाही वेळ मिळत नाही. दलाई लामांच्या या स्थितीवरच्या पुढील ओळी खूप काही सांगून जातात...

**इमारतीच्या उंची वाढल्या, पण माणसं खुजी झाली,**
**संवादाची साधनं वाढली, पण माणसातील संवाद कमी झाला**

म्हणून असे विसाव्याचे, विरंगुळ्याचे क्षण हवे असतात. या भेटीगाठींतून, एकमेकांसोबत वेळ घालवणे महत्त्वाचे ठरते. जगण्याचे ते टॉनिक बनते.

विद्यार्थी साहाय्यक समितीत यापेक्षा वेगळी स्थिती आहे. समिती हे युवा परिवर्तनाचे केंद्र आहे. ग्रामीण भागातील गरजू आणि होतकरू विद्यार्थी येथे आपले उच्च शिक्षणाचे स्वप्न साकारत असतात. एका बाजूला प्रतिकूल परिस्थिती आणि दुसऱ्या बाजूला या महानगरातील वास्तव समजण्यात, स्वतःला सावरण्यात त्यांचा सुरुवातीचा बराच काळ जातो. पण समितीच्या वातावरणात, विविध उपक्रमांत ती रुळली, तावून सुलाखून निघाली, की एक उत्तम माणूस म्हणून घडली जातात, समाजाचा जबाबदार नागरिक बनतात. रोजची अर्धा तासाची योगासने असतील, किंवा अर्धा तासाचे श्रमाचे मोल समजण्यासाठीचे काम. कमवा- शिका योजनेमधील सहभाग असेल किंवा विद्यार्थी विकास केंद्राच्या उपक्रमातील अनुभव. यात ती धडपडतात, चुकतात, पण जबाबदारी घेतल्यामुळे शिकतात नक्की...! हे अनुभव शिक्षण हाच समिती उपक्रमांचा गाभा आहे. जात- धर्म- पंथ विरहित प्रवेश, सर्वांना समान नियम, कुटुंबप्रमुखाप्रमाणे काळजी घेणारे पर्यवेक्षक, कार्यकर्ते, स्थानिक देणगीदार- पालक असे समितीचे वातावरण. समाजाच्या आर्थिक मदतीवर चालणाऱ्या या जगन्नाथाच्या रथाचे आपण सारथ्य करत आहोत, ही भावना या विद्यार्थ्यांच्या मनात पदोपदी असते, त्यातून त्यांची सामाजिक जाणीव जागृत राहते आणि आपणही समाजाचे काही देणे लागतो, या विचारातून त्यांचा पुढचा प्रवास सुरू होतो.

येथील शिक्षण संपून बाहेर पडल्यावर, काही जबाबदाऱ्यांतून स्थिरस्थावर झाल्यावर ते परत समितीकडे येतात, कृतज्ञतेच्या जाणिवेतून वेळेच्या रुपाने, आर्थिक रुपाने आपल्या परीने जे शक्य ते देत राहतात. ज्यांना इथे येणे शक्य होत नाही, ते आपल्या भागात ही जाणीव जागृत ठेवत सामाजिक कार्यात सक्रिय राहतात.

मी आणि माझे पाहण्याच्या या काळात आपले आणि समाजाचे पाहणारे वातावरण समितीत आहे. त्याचा अनुभव घेणारी आणि त्यातून घडणारी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील पिढी येथे आहे. ही एक पणती येथे जागृत होते, तिचा अंतरीचा दीप उजळला, की ती अंधःकार दूर करायला तयार होते, ज्योतीने ज्योत तेवत ठेवते, हा अनुभव आहे. मला वाटते दिवाळी यापेक्षा वेगळी काय असते?

**सर्वांना या चैतन्य उत्सवाच्या शुभेच्छा.**

\- **चंद्रकांत कुलकर्णी,** मुख्य विकास अधिकारी



## छोट्या छोट्या देणग्या देत उचलणार खारीचा वाटा

### ‘समिती’साठी माजी विद्यार्थिनींचा संकल्प



विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विविध प्रकल्पांसाठी दरमहा छोटी छोटी रक्कम जमा करून खारीचा वाटा उचलण्याचा संकल्प माजी विद्यार्थिनींनी केला आहे.

समितीच्या माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा गेल्या महिन्याच्या अखेरीस झाला. विविध बॅचमधील सुमारे शंभर जणी या मेळाव्यात सहभागी झाल्या होत्या. यावेळी कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी समितीच्या विस्ताराविषयी माहिती देत विद्यार्थ्यांमागील तूट भरून काढण्यात माजी विद्यार्थ्यांनी योगदान देण्याचे आवाहन केले.

समितीच्या कार्याला हातभार लावण्याची इच्छा प्रत्येकीलाच आहे, मात्र एकावेळी एकरकमी देणगी देणे शक्य होत नसल्याची खंत काही जणींनी व्यक्त केली. त्यावर दरमहा छोट्या छोट्या देणग्या देण्याचा पर्याय निवडण्यात आला. माजी विद्यार्थिनींचे गट करून प्रत्येक गटाच्या प्रमुखाकडे दरमहा ठराविक रक्कम जमा करायची. गटप्रमुखाने ती रक्कम एकत्रित स्वरुपात समितीत जमा करायची. देणगीची पावती संबंधित गटाच्या नावाने घ्यायची, अशी संकल्पना आहे. एकावेळी मोठी रक्कम भरायची नसल्याने प्रत्येकीला यात सहभागी होता येईल. समितीच्या कामात हातभार लावल्याचे समाधान व आनंद मिळेल. त्याचबरोबर दरमहा छोट्या रकमेच्या देणग्यांच्या अनेक पावत्या फाडण्याऐवजी गटाच्या नावे पावती तयार केल्याने समितीतील सहकाऱ्याचे कामही कमी होईल.



## तेजज्ञान फाउंडेशनतर्फे ध्यानाविषयी कार्यशाळा

तेजज्ञान फाउंडेशनच्या वतीने ७ ऑक्टोबर रोजी समितीत ध्यानावर आधारित कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. समितीच्या माजी विद्यार्थिनी राऊ मुंढे व नीता कोरटकर यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले. नीता कोरटकर यांनी ध्यानाबाबत माहिती दिली. त्यानंतर ध्वनिचित्रफितीच्या माध्यमातून ध्यानाचे महत्त्व सांगण्यात आले.



## पीचफेस्ट- २०२४ मध्ये सुर्वे, चव्हाण प्रथम

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि उपकरणशास्त्र विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या पीचफेस्ट-२०२४ या स्पर्धेत समितीतील विद्यार्थिनी साक्षी सुर्वे व साक्षी चव्हाण यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

या स्पर्धेच्या माध्यमातून उद्योगविषयक सृजनशील कल्पनांना चालना देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. स्पर्धेत पुणे शहर व परिसरातील २८ स्टार्टअप्स सहभागी झाले होते. स्पर्धेतील संकल्पनांचे परीक्षण व मार्गदर्शन प्रा. अरविंद शाळिग्राम, प्रा. श्यामला गोपालन, किरण नवाथे, प्रा. मिलिंद निकाळजे यांनी केले.

शिंपल्यातील मोती

## जीवनप्रवासात समितीची शिकवण मोलाची



मी सन २०१८ ते २०२१ या काळात समितीमध्ये वास्तव्यास होतो. फर्ग्युसन महाविद्यालयातून मी भूगर्भशास्त्र या विषयात पदवी घेतली. पदव्युत्तर शिक्षण सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागात पूर्ण केले.

विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये वास्तव्यास असताना बऱ्याच गोष्टी शिकायला आणि अनुभवायला मिळाल्या. त्यात अनेक उपक्रम आणि विविध उपसमित्यांमध्ये मी काम केले. विद्यार्थी विकास केंद्राच्या उपक्रमांमुळे अनेक विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला, तसाच मलाही दैनंदिन जीवनात या उपक्रमांचा फायदा झाला. पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी पुण्यातील अॅडव्हान्स सेंटर फॉर वॉटर रिसर्च डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट या कंपनीमध्ये ट्रेनी जिओलॉजिस्ट म्हणून काही काळ काम केले. त्यानंतर काही महिन्यांपूर्वी भूगर्भशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे प्रोजेक्ट असोसिएट म्हणून माझी निवड झाली. सध्या मी नांदेड जिल्ह्यातील महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणा राज्याच्या सीमा भागातील काही तालुक्यांत खडक, पाणी आणि माती या विषयावर काम करीत आहे. कामाचे स्वरूप बघता बऱ्याचदा आम्हाला फिल्ड वर्क असते आणि त्यामुळे सकाळी लवकर उठावे लागते. समितीमध्ये नियमित होत असलेल्या योगामुळे नेहमीच लवकर उठायची सवय लागली. कामाच्या अनुषंगाने अनेक लोकांशी औपचारिक संवाद साधावा लागतो. विद्यार्थी विकास केंद्रामध्ये ज्या गोष्टी शिकल्या, अनुभवल्या त्यामुळे आज लिखाण, संवाद यात कधीच अडथळा येत नाही. समितीचा मोठा मोलाचा वाटा माझ्या या जीवन प्रवासात आहे. तसेच समितीने दिलेली शिकवण मला जीवन जगत असताना वेळोवेळी खूप मोलाची वाटते. पाल्य- पालक योजनेद्वारे नवीन लोकांशी संपर्क वाढला, त्याचबरोबर चार तास काम, कमवा व शिका, सहाय्य संकलन अशा अनेक उपसमित्यांमध्ये कामाचा दांडगा अनुभव मिळाल्याने माझे जीवन जगणे आज सुखकर झाले आहेत. समितीचे हे ऋण कधी न फिटण्यासारखे आहे. मात्र सध्या किंवा भविष्यात माझ्या परीने जे काही सहकार्य समितीला करता येईल, त्यासाठी मी नेहमी तत्पर असेल.

**- कार्तिक तडसे,** माजी विद्यार्थी

## आवडत्या पुस्तकाविषयी मुलींनी मांडले विचार

### डॉ. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी समितीत वाचक दिन साजरा



वाचन म्हणजे केवळ शब्दांपुढे शब्द वाचणे नव्हे, तर त्या लेखनाचा आशय समजून घेणे आणि त्यावर स्वतःचे मत व्यक्त करता येणे, असे अभिप्रेत असते. समितीतील विद्यार्थ्यांना अशा वाचनाची सवय लागावी, यासाठी एका अभिनव उपक्रमाचे आयोजन ग्रंथालय उपसमितीच्या वतीने आयोजन करण्यात आले होते.

माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर हा वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. त्याचप्रमाणे ३ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यास मान्यता दिली. या दोन्ही गोष्टींचे औचित्य साधून १५ ऑक्टोबर रोजी वाचक दिन साजरा करण्यात आला. यात विद्यार्थ्यांना त्यांनी वाचलेल्या पुस्तकाविषयी बोलण्याची, अभिप्राय व्यक्त करण्याची संधी देण्यात आली. त्याचबरोबर मराठीला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा हा विषयही देण्यात आला होता.

डॉ. आपटे वसतिगृहात झालेल्या या उपक्रमात सुमित्रा सदनमधील १२, आपटे वसतिगृहातील ६ व नवीन वसतिगृहातील ७ मुलींनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाला मुली मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. मुलांची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवली.

दररोज वर्तमान पत्र वाचणे का गरजेचे आहे, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणजे काय, या विषयावर मुलींनी मत व्यक्त केले. अभिप्राय व्यक्त करण्यासाठी मुलींनी त्यांच्या आवडत्या पुस्तकाची निवड केली होती, त्यात मृत्युंजय, 3000 टाके, संभाजी, मी माणूस शोधतोय, छावा, गरुडझेप, रिच डॅड पुअर डॅड, मी आणि आमचा बाप, आर्टिफिशियल इंटेलिजेंस, शिवाजी महाराजांचे चरित्र या पुस्तकांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या शेवटी ग्रंथालय उपसमितीच्या अध्यक्षा वासंती नाटेकर यांनी सुधा मूर्ती यांच्या परिघ पुस्तकावर अभिप्राय दिला. प्रथमच झालेल्या या उपक्रमाला मुलींकडून मोठा प्रतिसाद मिळाला.

समिती वृत्त




## कृतीतून दिला रक्तदानाचा संदेश

### शिबिरात ५१ जणांचा सहभाग, विद्यार्थ्यांकडून जनजागृती

विद्यार्थी विकास केंद्र व सामाजिक जाणीव प्रकल्पांतर्गत महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त २ ऑक्टोबरला रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण १५० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाल्या. रॅलीनंतर झालेल्या रक्तदान शिबिरात ५१ जणांनी सहभाग घेतला.

सकाळी साडेसात ते साडेनऊ या दरम्यान ही रॅली काढण्यात आली. लजपत संकुल (शिवाजी हाउसिंग सोसायटी)- धोत्रे चौक- दीप बंगला चौक- डॉ. आपटे वसतिगृह- दीप बंगला चौक- कुसाळकर चौक- लजपत भवन हा रॅलीचा मार्ग होता. रॅलीत ‘रक्तदान श्रेष्ठदान’ अशा घोषणा देत रक्तदान जनजागृतीचा संदेश देण्यात आला. जागोजागी पथनाट्याच्या माध्यमातून रक्तदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

रॅलीनंतर लजपत संकुल येथे सह्याद्री मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल रक्तपेढी व सामाजिक जाणीव प्रकल्प यांच्या वतीने शिबिर झाले. ५१ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. रक्तदानानंतर विद्यार्थ्यांना अल्पोपाहार व प्रमाणपत्र देण्यात आले. शिबिरादरम्यान समितीचे कार्यकर्ते हरिश अष्टेकर, निसार चौगुले, शुभांगी चिरपुटकर यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. शिबिरासाठी सर्व पर्यवेक्षकांचे मार्गदर्शन लाभले. आयोजनासाठी विद्यार्थी विकास केंद्र टीम, विद्यार्थी व्यवस्थापन टीम, सामाजिक जाणिव प्रकल्प टीम यांनी परिश्रम घेतले.

सह्याद्री हॉस्पिटलकडून समितीला प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन आभार मानण्यात आले.

## गडभ्रमंती, संपर्क, स्वच्छता आणि निसर्गाचा आनंद...!

### समितीतील ५२ विद्यार्थ्यांनी केला रायगड ट्रेक

विद्यार्थ्यांना ऐतिहासिक ग़डकिल्ल्यांची माहिती व्हावी, तेथील निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेता यावा, त्याचबरोबर परिसरातील स्थानिक लोकांना समितीविषयी माहिती देऊन संपर्क वाढवावा, या उद्देशाने विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वतीने एक दिवसाच्या रायग़ड ट्रेकचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यकर्ते श्री. निसार चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली २० ऑक्टोबर रोजी काढलेल्या या ट्रेकमध्ये २५ मुले, २७ मुली असे ५२ जण सहभागी झाले होते. पर्यवेक्षक नम्रता गजरे आणि सचिन खांडेकर यांचाही विद्यार्थ्यांबरोबर सहभाग होता.

ट्रेकदरम्यान निसार चौगुले यांनी स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. स्पर्धेतील विजेत्यांना शैक्षणिक साहित्य बक्षीस देण्यात आले. गडावर स्वच्छता मोहिमही राबविण्यात आली. विद्यार्थ्यांनी गडावरील कचरा गोळा करून खाली आणला. यावेळी स्थानिक लोकांशी संवाद साधून त्यांना विद्यार्थी सहाय्यक समितीची माहिती देण्यात आली. त्याचबरोबर तरुण उद्योजक यांची भेट घेऊन संवाद साधला. त्यांना समिती भेटीचे निमंत्रण दिले.



## माजी विद्यार्थी डॉ. पवन सुशीर अडावदचे आरोग्य अधिकारी

समितीचे माजी विद्यार्थी डॉ. पवन सुशीर यांची महाराष्ट्र सरकारच्या आरोग्य विभागामध्ये आरोग्य अधिकारी (MEDICAL OFFICER) या पदावर नियुक्ती झाली आहे. जळगाव जिल्ह्यातील अदावाद येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात त्यांची नेमणूक आहे.